I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# भंडारा जिल्हातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**स्मिता रामकृष्ण गजभिये**
एम.ए. (गृहअर्थशास्त्र, इतिहास) एम.एड, नेट (गृहअर्थशास्त्र)

**प्रास्ताविक :**

शिक्षणामुळे मानवाला आपले भविष्य उज्वल करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण व विद्यापीठीय शिक्षण असे आपल्या शिक्षण व्यवस्थेचे विविध स्तर आहेत. शिक्षणाच्या विविध स्तरामधील प्रत्येक स्तर जरी महत्वाचा असला तरी विशेष करुन विदयार्थी जीवनाच्या दृष्टीने माध्यमिक स्तर हा अधिक महत्वाचा आहे. माध्यमिक शिक्षण हे विदयार्थ्यांना विधायक वळण लावणारे शिक्षण आहे.

माध्यमिक शिक्षणाला व्यक्तीच्या जीवनात व समाजाच्याही दृष्टीने फार महत्वाचे स्थान आहे. कारण माध्यमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षणास व उच्च शिक्षणास जोडणारा दुवा आहे. माध्यमिक शिक्षण लोकशाहीला समृध्दतेकडे नेण्याचे एक साधन आहे.

व्यक्ती शिवाय समाज आणि समाजाशिवाय व्यक्तीच असू शकत नाही. सामाजिक परिस्थीती जसजशी बदलत जाते त्याप्रमाणे शिक्षण प्रक्रिया बदलनांना दिसते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्यक्ती व समाजाला शिक्षणाची आवश्यकता आहे.

ज्या समुहात किंवा समाजात व्यक्ती वावरत असते त्यात इतरांच्या तुलनेत तिचे स्थान कोणते यावर तिचा दर्जा अवलंबून असतो. शिक्षण व्यावसायिक प्रतिष्ठा व सांपत्तीक स्थिती इत्यादीमुळे हा दर्जा निर्धारीत होत असतो.

मानव हा विकसनशील प्राणी आहे. शिक्षण प्रक्रियेतच्या माध्यमातून व्यक्तीच्या सर्वांगिण विकास होतो. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विदयार्थ्यांचा विकास घडत असतो. त्यांच्यामध्ये होणारे बदल सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

संपूर्ण शिक्षणाचा सांगोपांग विचार करुन राष्ट्राच्या शिक्षणाची योजना आखण्यासाठी विदयापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली २ ऑक्टोंबर १९६४ या दिवशी शिक्षण आयोगाची (१९६४–६६) नियुक्ती झाली. आधुनिक शिक्षणासंबंधी विचार करण्यासाठी नेमलेला असा हा भारतातील सहावा आयोग होय.

आज देशापुढे अनेक प्रश्न उभे आहेत. अन्नस्वावलंबन, आर्थिक विकास, सामाजिक व राष्ट्रीय एकता, लोकशाहीचे स्थिरीकरण, स्वातंत्राचे संरक्षण, आंतराट्रीय मानाचे स्थान इत्यादी. हे सर्व प्रश्न सोडविण्याच्या कार्यात शिक्षण हेच प्रभावी साधन होय.

संशोधनाचे महत्व :

विदयार्थ्यांच्या सामाजिक , आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे महत्वाचे का आहे ? शिक्षणातून जबाबदार व कर्तव्यदक्ष नागरीक निर्माण करुन जगामध्ये आत्मविश्वाने पाऊल कसे टाकावे हे विदयार्थ्यांना पटवून दिले जाते.

संशोधन हे ज्ञानवृध्दी, जुन्या ज्ञानाचे परिक्षण करणे या उद्देशाने केले जाते. यामुळे सामाजिक प्रक्रिया, सामाजिक व्यवस्था इत्यादी संबंधीचे ज्ञान विकसीत होते. सामाजिक बांधीलकी व श्रमप्रतिष्ठेची जाणीवही त्यांच्यात शिक्षणातून निर्माण होते. या सर्व बाबी लक्षात घेता माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती व त्याचे शैक्षणिक विकास कोणत्या प्रकारचा आहे हे बघण्याच्या दृष्टीने सदर संशोधन महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१. माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनीच्या सामाजिक आर्थिक स्थिती विषयी शोध घेणे.
२. ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या वैचारीक विकासाचा शोध घेणे.
३. शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचा शोध घेणे.
४. ग्रामीण व शहरी क्षेत्रातील विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे तुलनात्मक अध्ययन करणे.
५. माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
६. ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक , आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
७. शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
८. ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
९. शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
१०. ग्रामीण व शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या शैक्षणिक विकासाचे अध्ययन करणे.

११. ग्रामीण व शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयर्थीनींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधनाच्या परिकल्पना :**

१. माध्यमिक विदयार्थ्यांच्या (संपूर्ण न्यादर्श) सामाजिक आर्थिक स्थितीमध्ये लक्षणीय फरक आढळून येतो.
२. माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक आर्थिक स्थितीमध्ये फरक आढळून येत नाही.
३. ग्रामीण व शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीमध्ये फरक आढळून येतो.
४. ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक , आर्थिक स्थितीमध्ये लक्षणीय फरक आढळून येतो.
५. शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक , आर्थिक स्थितीमध्ये लक्षणीय फरक आढळून येत नाही.
६. ग्रामीण क्षेत्रातील मुले व मुली यांच्या शैक्षणिक विकासादरम्यान लक्षणीय फरक आढळून येत नाही.
७. शहरी क्षेत्रातील माध्यमिक मुले व मुली यांच्या शैक्षणिक विकासादरम्यान लक्षणीय फरक आढळून येत नाही.
८. ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांची सामाजिक आर्थिक स्थिती व त्यांच्या शैक्षणिक विकास यामध्ये सहसंबंध आढळून येतो.
९. शहरी क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थ्यांची सामाजिक आर्थिक स्थिती व त्यांच्या शैक्षणिक विकास यामध्ये सहसंबध आढळून येतो.
१०. माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती आणि शैक्षणिक विकास यामध्ये सहसंबध आढळून येतो.
११. माध्यमिक विदयार्थ्यांच्या राहत्या क्षेत्राचा (ग्रामीण व शहरी) त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती व शैक्षणिक विकास यासोबत सहसंबध आढळून येतो.

**परिमर्यादा :**

१. सदर संशोधन माध्यमिक इयत्ता ९ वी व १० वी च्या विदयार्थ्यापुरतेच मर्यादीत राहील.
२. सदर संशोधन विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीच्या अभ्यासापुरतेच मर्यादीत राहील.
३. सदर संशोधन विदयार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचा अध्ययनापुरतेच मर्यादीत राहिल.
४. सदर संशोधन ग्रामीण व शहरी क्षेत्रातील माध्यमिक शाखेतील विदयार्थ्यांपुरतेच मर्यादीत राहिल.

**पूर्व संशोधनाचा आढावा :**

कोणतेही संशोधन कार्य करीत असतांना त्याविषयी संबधीत पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे संशोधनाशी संबंधीत विषयावर किती प्रमाणात संशोधन झाले आहे याची माहिती प्राप्त होते. तसेच पूर्वी झालेल्या संशोधनात कुठल्या पध्दतीचा वापर करण्यात आला तसेच संशोधन करतांना संशोधकाला कोणकोणत्या समस्या जाणवल्या याचा देखील आढावा घेता येतो. सर्वात महत्वाचे म्हणजे या विषयावर आतापर्यंत झालेल्या संशोधनात विषयांशी संबंधीत कोणत्या घटकांवर संशोधन अदयाप झाले नाही, याची माहिती प्राप्त होते. म्हणजेच संशोधन उणिवा माहित होतात.

पूर्वीच्या संशोधनाचा आढावा घेतला तर संशोधकाला त्यांच्या कार्याची दिशा सापडून आतापर्यंत झालेल्या संशोधनामध्ये कोणत्या त्रुटी आहेत त्या जाणून घेऊन संशोधनाला पुढे कोणता शोध लावायचा आहे हयाची माहिती घेता येते. प्रस्तुत प्रकरणात संशोधकेने निवडलेला विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :**

विदयार्थी हे समाजाचा एक भाग आहे व त्यांची सामाजिक आर्थीक स्थिती ही समाजाशी संबंधीत आहे. त्यांचा उचित शैक्षणिक विकास होण्याच्या दृष्टीकोनातून समाजाच्या सहभागाची नितांत आवश्यकता आहे. या हेतूने प्रस्तुत संशोधन हे सामाजिक संशोधन क्षेणीत मोडते. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला.

अध्ययन विश्व :

प्रस्तुत अध्ययना अंतर्गत माध्यमिक स्तरावरील (इयत्ता ९ व १० मध्ये शिकणाऱ्या) सर्व विदयार्थ्यांचा अध्ययन विश्वात समावेश करण्यात आला.

**नमुना पध्दती :**

प्रस्तुत अध्ययानात स्तरीय यादृच्छीक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. अध्ययना करीता निवडण्यात आलेल्या भंडारा जिल्हयातील ८ शहरी व ७ ग्रामीण माध्यमिक शाळा मधील एकुण ६०० विदयार्थ्यांची निवड करण्यात आली यापैकी ३०० (१५० मुले व १५० मुली) विदयार्थी शहरी तर ३०० (१५० मुले व १५० मुली) ग्रामीण भागातील होते.

**चर्चा :**

शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत शिक्षण चालू असते. शिक्षण प्रक्रिया ही पुर्व प्राथमिक , प्राथमिक, माध्यमिक किंवा महाविद्यालयीन क्षेत्रापुरती मर्यादीत नसते. या क्षेत्राच्या बाहेर पडल्यानंतर सुध्दा व्यक्तीच्या सभोवताली असलेला परीसर, समाज, इतर व्यक्ती, विविध अनुभव या सर्वामधून व्यक्तीचे सतत शिक्षण सुरु असते.

प्रस्तुत संशोधन हे भंडारा जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीच्या प्रभावाचे अध्ययन करण्याच्या उद्देश्याने करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे यासंशोधनात ग्रामीण व शहरी माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थिती व शैक्षणिक विकासाचे तुलनात्मक अध्ययन देखील करण्यात आले.

कालडस व सहकारी (१९९७) यांना असे दिसून आले की, गरीबीमुळे बालक शिक्षणावर योग्य ते लक्ष देत नसल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक यशावर नकारात्मक प्रभाव होतो. मुइजस (१९९७) यांना शैक्षणिक यशाचे पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीशी संबंध असल्याचे आढळते. ओकपाला व सहकारी (२००९) यांना आपल्या अध्ययनात पालकांच्या सामाजिक, आर्थिक दर्जाचा बालकांच्या शैक्षणिक यशासोबत सहसंबंध आहे असे निदर्शनास आले. सीरीन (२००५) यांच्या संशोधनात सामाजिक, आर्थिक स्थिती व शैक्षणिक यशादरम्यान असलेल्या

संबंधाचे अध्ययप केले. त्यांना बालकांची सामाजिक, आर्थिक स्थिती व शैक्षणिक यशामध्ये संबंध असल्याचे आढळले. बॅरी (२००६) यांनी बालकाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक यशावर होणाऱ्या परीणामासंबंधी अध्ययन केले. ज्यात त्यांना सामाजिक आर्थिक स्थितीचा बालकांच्या शैक्षणिक यशावर परीणाम होतो. असे आढळते. जेओंग व एकॉक (२०१४) यांना असे निदर्शनास आले की, बालकांच्या शैक्षणिक यशावर त्यांच्या निम्न आर्थिक स्तराचा नकासरात्मक प्रभाव होतो.

उपरोक्त अध्ययन कर्त्यांनी प्रस्तुत संशोधन विषयाशी मिळत्या–जुळत्या विषयावर अध्ययन केले. उपरोक्त संशोधनात प्राप्त परिणाम व प्रस्तुत संशोधनाचे परिणाम यात सार्थक साम्य असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रस्तुत संशोधन हे योग्य पध्दती व दिशेने करण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.

वरील अध्ययनाप्रमाणेच या अध्ययनाचे मुख्य परिणाम दर्शवितात की, भंडारा जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर प्रभाव होतो. त्याचप्रमाणे विदयार्थ्यांच्या राहत्या (ग्रामीण/शहरी) त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती व शैक्षणिक विकासावर प्रभाव होत असल्याचे आढळते.

**मुख्य निष्कर्ष :**

उपरोक्त निष्कर्षाच्या आधारे हे मुख्य निष्कर्ष मांडण्यात येते की, भंडारा जिल्हयातील माध्यमिक शाळामध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत अंतर आहे. बहुतांश विदयार्थ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती सामान्य (सरासरी) स्तराची आहे. तसेच ग्रामीण व शहरी विदयार्थ्यांच्या (मुले व मुली) सामाजिक, आर्थिक स्थितीत अंतर असून शहरी विदयार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण विदयार्थ्यांचे सामाजिक, आर्थिक स्तर महत्वपूर्ण कमी आहे. तथापी विदयार्थी व विदयार्थीनींच्या (ग्रामीण व शहरी) सामाजिक, आर्थिक स्थिती दरम्यान फरक नाही.

क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण क्षेत्रातील माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींची सामाजिक, आर्थिक स्थिती सामान्य स्तराची असली तरी ग्रामीण माध्यमिक विदयार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण माध्यमिक विदयार्थीनींची सामाजिक आर्थिक स्थिती महत्वपूर्णपणे उच्च सामान्य स्तराची आहे. तथापी शहरी माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीदरम्यान सार्थक फरक नाही.

ग्रामीण माध्यमिक विदयार्थ्यांच्या शैक्षणिक विकास स्थितीच्या तुलनेत विदयार्थीनींची शैक्षणिक विकास स्थिती महत्वपूर्णपणे उत्तम आहे. शहरी माध्यमिक विदयार्थी व विदयार्थीनींच्या शैक्षणिक विकास स्थिती दरम्यान सार्थक अंतर नाही.

ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रातील विदयार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती व शैक्षणिक विकासादरम्यान घनिष्ठ धनात्मक सहसंबंध आहे. त्याचप्रमाणे त्यांचे राहते क्षेत्र (ग्रामीण व शहरी) व त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती तसेच शैक्षणिक विकासादरम्यान घनिष्ठ धनात्मक सहसंबंध आहे.

**पुढील संशोधनाकरीता शिफारशी :**

१. विदयार्थ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती व त्यांच्या भावनिक व शैक्षणिक समस्या यांचे सहसंबंधात्मक अध्ययन करण्यात यावे.
२. विदयालयाद्वारे विदयार्थ्यांमध्ये शैक्षणिक विकास सुधारणा प्रयत्नांचा आढावा घेण्यात यावा.
३. विदयालयाद्वारे विदयार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोई–सुविधांचा आढावा घेण्यात यावा.
४. विदयार्थ्यांना शिक्षण घेतांना येणाऱ्या विविध समस्यांचे अध्ययन करण्यात यावे.

**संदर्भ सूची**

१. अहेर, हिरा (१९९५) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक
नागपूर विदया प्रकाशन
२. आगलावे प्र. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे
विदया प्रकाशन, २००० प्र.९७०
३. आगलावे, प्रदिप (२००७) सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे
नागपूर श्री साईनाथ प्रकाशन
४. आगलावे, डॉ.प्रदिप समाजशासीय संकल्पना
श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर द्वितीय आवृत्ती १९९९ पान नं.१३३
५. करंदीकर, सुरेश शैक्षणिक मानसशास्त्र
फडके प्रकाशन कोल्हापूर प्र.४५
६. करंदीकर सुरेश, मंगरुळकर मना, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण
फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र.१०.१८
७. कऱ्हाडे, बि.एम. शास्त्रीय संशोधन पध्दती
पिंपळापुरे पब्लिसर्श २०११, पृ.१–३
८. कुलकर्णी, के.व्ही. (१९७७) शैक्षणिक मानसशास्त्र
पुणे श्री.विदया प्रकाशन
९. गाजरे, चिटणीस, पाटील (२००५) शिक्षणाचे अधिष्ठान,
पुणे नूतन प्रकाशन

❖❖❖❖